# सापळा केस

दिनांक ८/९/२०२०

**आलोसे स्वाती सुर्यवंशी उपजिल्हाधिकारी, श्रीकांत करभाजणे अव्वल कारकुन ,अब्दुल हकीम अब्दुल खयुम सिव्हील इंजिनिअर यांनी ४,५०,०००/— रू लाच स्विकारले बाबत यशस्वी सापळा कारवाई.**

यातील तक्रारदार यांनी ला.प्र.वि.परभणी येथे दि. ७.९.२०२० रोजी समक्ष हजर राहुन तक्रार दिली की, उपजिल्हाधिकारी स्वाती सुर्यवंशी हया गंगाखेड नगर परीषद गंगाखेड येथील विकास कामाचे प्रशासकीय मान्यतेसाठी नगर परिषद विभाग जिल्हाप्रशासन यांचेकडे दाखल केलेला प्रस्ताव मंजुर करण्यासाठी त्यांना (संबधित नगर सेवकाच्या वतीने) प्रस्तावाच्या एकुण रक्कमेच्या १.५ टक्के प्रमाणे ४,५०,०००/— रूपये लाचेची मागणी करत असुन ते त्यांना सदर प्रस्ताव अनुशंगाने भेटणार आहेत तरी त्यांनी लाचेची मागणी करून स्वत: किंवा इतरामार्फत लाच स्विकारल्यास त्यांचेवर कायदेशिर कार्यवाही करावी.

त्यानुसार दि. ७/९/२०२० रोजी ला.प्र.वि परभणीकडुन पंचासमक्ष पडताळणी कार्यवाही करण्यात आली सदर कार्यवाहीत तक्रारदार यांना आलोसे क्र. २ श्रीकांत विलासराव करभाजणे अव्वल कारकुन नगर पालीका प्रशासन विभाग जिल्हाधिकारी कार्यालय परभणी, आलोसे क्र. ३ अब्दुल हकीम अब्दुल खयुम सिव्हील इंजिनिअर , नगर परिषद गंगाखेड ने. नगर पालीका प्रशासन विभाग जिल्हाधिकारी कार्यालय परभणी यांनी तक्रारदार यांना नगर परिषद गंगाखेड येथील विकास कामाची प्रशासकीय मान्येते साठी १.५ टक्के म्हणजे अंदाजे ४,५०,०००/— रूपये लाचेची मागणी पंच क्र. १ यांचे समक्ष मागणी करून आलोसे क्र. २ व ३ यांनी तक्रारदारास आलोसे क्र.१ स्वाती वसंतराव सुर्यवंशी उपजिल्हाधिकारी ,जिल्हाधिकारी कार्यालय परभणी यांचे समक्ष त्यांना हजर केले असता त्यांनी रक्कम स्विकारण्यासाठी संमती दर्शविली.

आज दि.८/९/२०२० रोजी नगर पालीका प्रशासन विभाग जिल्हाधिकारी कार्यालय परभणी येथील अव्वल कारकुन श्रीकांत विलासराव करभाजणे यांचे कक्षामध्ये सापळा कार्यवाही दरम्यान आलोसे क्र.२ विलासराव करभाजणे अव्वल कारकुन नगर पालीका प्रशासन विभाग जिल्हाधिकारी कार्यालय परभणी,यांचे सांगणे वरून आलोसे क्र. ३ अब्दुल हकीम अब्दुल खयुम सिव्हील इंजिनिअर, नगर परिषद गंगाखेड ने. नगर पालीका प्रशासन विभाग जिल्हाधिकारी कार्यालय परभणी यांनी पंच क्र. १ यांचे समक्ष लाचेची रक्कम स्विकारली आहे. आलोसे क्र. २ व ३ यांनी आलोसे क्र. १ यांचे सांगणेवरून रक्कम स्विकारल्याने नमुद तीनही आरोपीस स्विकारलेल्या लाचेची ४,५०,०००/— रूपये रक्कमेसह ताब्यात घेण्यात आलेले आहे. वर नमुद आलोसे यांचे विरूध्द पोस्टे नवामोंढा परभणी येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कार्यवाही श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधिक्षक, नांदेड परिक्षेत्र नांदेड व श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधिक्षक, नांदेड परिक्षेत्र नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक श्री.भरत के. हुंबे ,पोलीस निरीक्षक श्री.अमोल कडु, पोह/जहागीरदार, पोह/शकील, पोना/अनिल कटारे, पोशि/चट्टे, पोना/अनिरूध्द कुलकर्णी, पोशि/सचिन धबडगे, पोना/शेख मुखीद, पोशि/मुक्तार, मपोशि/सारीका टेहरे, चापोना/कदम, चापोह/चौधरी, अे.सी.बी.परभणी यांनी यशस्वी केलेली आहे.

परभणी जिल्हयातील नागरीकांनी लाचखोर भ्रष्टाचारी लोकसेवकां विरूध्द तक्रार देण्यासाठी अथवा भ्रष्टाचारी विरूध्द करण्यात येणा—या कारवाई बाबत अधिक माहीतीसाठी खालील दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी यांचेकडून केले आहे.

**दुरध्वनी क्रमांक ०२४५२—२२०५९७**

**टोल फ्री क्रमांक १०६४**

**Email ID -** dyspacbparbhani@gmail.com

श्रीमती कल्पना बारवकर,पोलीस अधिक्षक,ला.प्र.वि.नांदेड,परिक्षेत्र नांदेड — ८८८८८४१९६५

श्री. भरत के. हुंबे, पोलीस उप अधिक्षक — ७०२१००२११०

श्री. अमोल कडु, पोलीस निरीक्षक — ८०८७०७२९१९

Scanned with CamScanner